सोलापूर
तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# एका क्लिकची चूक, मोठा धोका!

# सायबर सुरक्षेबाबत जनजागृती प्रशिक्षण




तभा वृत्तसेवा

लातूर : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात व जवळच्या गावात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत प्रतिभा निकेतन विद्यालय लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

या आठवड्यात एक दिवसीय प्रशिक्षण दरम्यान इयत्ता पाचवी ते दहावीच्या २५० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर ऑफिसर जाधव योगिता आणि सायबर ऑफिसर बोरूळे प्राजक्ता यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख)च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर, मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या दुव्यांपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर तसेच डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक कलशेट्टे यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी समस्त शिक्षक मंडळी व बाकी सर्व सदस्यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले.